Exh. /D

रे. क. नं. ९४/२०२६

मे. दिवाणी न्यायाधिशसो कनिष्ठ स्तर, कागल.
यांचे कोर्टात.........

सचिन लक्ष्मण जानवे ... वादी

विरुध्द

नाना जोती कांबळे, वगैरे ... प्रतिवादी

**<u>सी. पी. सी. ऑर्डर ६ रुल १७</u>**
**<u>प्रमाणे दावा दुरुस्तीसाठी अर्ज.</u>**

**<u>यातील वादीतर्फे विनंती अर्ज की,</u>**

Order
Other side to say
C.J.J.D.Kagal
29-06-2026

१) प्रस्तुतचा दावा वादीनी प्रतिवादी विरुध्द कायम मनाई व अज्ञार्थी आदेशाकरीता दाखल केलेला आहे.

२) प्रस्तुत दाव्याचे कामी वादीनी संचकारपत्राबाबत पुर्तता करुन सदर संचकारपत्रात नमूद खरेदीची रक्कम याकामी दाखल करणे अत्यंत आवश्यक आहे. त्याकारणांने दाव्याच्या टायटल क्लॉजमध्ये दावा रुपये व ज्युरिसडिक्शनकरीता रु. २,०००/– च्या ऐवजी **"रु. १३,३१,२६,०००/–"** असे नमूद करणेस तसेच दावा अर्जी कलम (१२) दाव्याचा तपशिल यामध्ये रु. १,०००/– च्या ऐवजी **"रु. १३,३१,२५,०००/–"** तसेच एकूण किंमत व दाव्याची आकारणी रु. २,०००/– च्या ऐवजी **"रु. १३,३१,२६,०००/–"** अशी दुरुस्ती करणेस परवानगी मिळणे न्यायाचे व आवश्यक आहे.

29.06.2026

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.
Kagal

३) वर कलम (२) मध्ये नमूद केलेप्रमाणे दुरुस्ती करणेस वादींना परवानगी मिळालेस यातील प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणेचा न्यायाच्या दृष्टीने संभव देखील नाही. याउलट सदर दुरुस्तीस परवानगी न दिलेस सदर वादीचे कायदेशीर हक्क डावलले जाणार असून कधीही व कशानेही न भरुन येणारे असे नुकसान होणार आहे.

४) वर कलम (२) मध्ये नमुद प्रमाणे दुरुस्ती करणेमध्ये यातील वादींनी कोणताही हलगर्जीपणा व निष्काळजीपणा कधीही केलेला नव्हता व नाही.

५) वर कलम (२) मध्ये नमुद प्रमाणे दुरुस्ती करुन यातील वादी हे कोणतीही नवीन केस अगर मूळ केसशी विसंगत अशी केस कधीही निर्माण करत नव्हते व नाहीत.

६) यातील वादी व प्रतिवादी यांचेदरम्यान असलेल्या वादावर अंतिमपणे पडदा टाकणेसाठी देखील वर कलम (२) मध्ये नमुद प्रमाणे दुरुस्ती करणेस परवानगी मिळणे न्यायाचे व आवश्यक आहे.

७) मल्टीप्लिसिटी ऑफ प्रोसिंडीग टाळणेसाठी देखील वर कलम (२) मध्ये नमूद प्रमााणे दुरुस्ती करणेस परवानगी मिळणे गरजेचे आहे.

८) न्यायाचा व इक्वीटीच्या दृष्टीनेही वर कलम (२) मध्ये नमूद केलेप्रमाणे दुरुस्ती करणेस परवानगी मिळणे गरजेचे आवश्यक व अगत्याचे आहे.

९) **<u>सबब, वादीची विनंती की,</u>**

अ) वर कलम (२) मध्ये नमूद केलेप्रमाणे दावा दुरुस्त करणेस वादींना परवानगी मिळावी.

29.6.2026
Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

ब)	इतर अनुषंगिक हुकूम याच कामी वादीच्या वतीने व्हावेत ही नम्र विनंती.

---

येणेप्रमाणे अर्ज असे.

कागल. ता. २९/०६/२०२६

1) [signature]
2) [signature]

**ॲफिडेव्हीट**

मी यातील वादी नं. २ कुमार चंद्रकांत पाटील, व.व. ४६, धंदा – व्यवसाय, रा. पाटील नगर, नेर्ली, ता. करवीर, जि. कोल्हापूर देवाचे शपथेवर कथन करतो की, वरील अर्जातील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले ॲफिडेव्हीट आज मुाा कागल. ता. २९/०६/२०२६

मी ॲफिडेव्हीट करणार यांना ओळखतो.

[signature]
ॲडव्होकेट
(ॲड. वाय. एस. केसरकर)

[signature]
ॲफिडेव्हीट करणार

**प्रतिज्ञा**

मी यातील वादी नं. २ कुमार चंद्रकांत पाटील, व.व. ४६, धंदा – व्यवसाय, रा. पाटील नगर, नेर्ली, ता. करवीर, जि. कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील अर्जातील व ॲफिडेव्हीटमधील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा आज मुाा कागल. ता. २९/०६/२०२६

[signature]

The Contents of the affidavit are read over and explained to the deponent in Marathi and he/she admit it to be true and correct.

Asstt. Supdt.

Solemnly Affirmed before me by Shri. Kumar Chandrakant Patil Age 46 of Nerli, Karvir .....who is identified by Shri Y. S. Kesarkar Adv .............whom I know personally

Dated :- 29.06.2026

Assistant Superintendent
Kagal.

MADKE AJIT BHISHMA
Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2026.06.29 17:42:41 +0530